साप्ताहिक लोकप्रभा

लोकसत्ता
१८ सप्टेंबर २००९









माझ्या आयुष्यातल्या मला शुभंकर वा भयंकर वाटणाऱ्यांसोबत माझी अशीच अल्केमिस्ट्री जुळून जाते. तीच अल्केमिस्ट्री मी लोकप्रभाच्या वाचकांसाठी आणतोय. या अल्केमिस्ट्रीत जी माणसं तुम्हाला भेटतील त्यांनी माझ्या आयुष्यावर प्रयोग केलेत. मीही त्यांच्या आयुष्यावर प्रयोग केलेत. पण आम्ही नेहमीच एकमेकांना भेटलोय असं नाही.

**राजू परुळेकर**



# जितेंद्र (होर्डिंग्ज) आव्हाड

बंटी आव्हाडला मी जवळजवळ १५ वर्षांहून जास्त काळ ओळखतो. जाहीरपणे बऱ्याचदा मी त्याचा विरोधक म्हणून भरपूर लिहिलेलं किंवा बोललेलो आहे. तो कधीच त्यावर विरुद्ध प्रतिक्रिया देत नाही. 'तुमचं हे चालायचंच', अशी फक्त एकच ओळ त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी बोलून तो विषय संपवतो. त्याच्याविरुद्ध बोलताना किंवा लिहिताना त्याला जे 'डॅमेज' होतं त्याचं मला मनापासून वाईट वाटतं. पण त्याच्या 'एक्झिबिशनिस्ट' (प्रदर्शनकारी) वृत्तीचा मला तिटकारा येतो आणि मग डोकंच फिरतं. ठाण्यात मोठमोठी होर्डिंग्ज लावून किंवा इव्हेन्टस् करून जे थैमान बंटीचे समर्थक घालतात; त्यामुळे तो प्रसिद्ध होण्यापेक्षा बदनाम अधिक होतो! हे अभिजात नसून बटबटीत आहे! असं मी त्याला अनेकदा सांगितलंय. पण तो जसा आहे त्याला मुळं खूप खोल गेलेली कारणं आहेत. वर्तमानपत्रं म्हणजे ज्ञान भांडार मानणाऱ्या आजच्या नवब्राह्मण्यवादी मंडळीना

ती कारणं कधीच कळणार नाहीत. अर्थात त्यांना ते जाणून घेण्यात रसही नाही. बंटीचं
मोठ्ठं होर्डिंग बघून नाक मुरडून ते पुढे निघून जातात. त्याच्या दहिहंडीतला बटबटीतपणा मिटक्या मारून बघत स्वत:च्या घरात टी.व्ही.समोर त्याला शिव्या घालून मग बॅडमिंटन खेळायला किंवा मुलाच्या दहावीच्या वर्षांची चिंता करणाऱ्या वर्गाला बंटी कुठल्या आक्रोशाचं संतान हे कधीच कळणार नाही.

मी कुणाचाही द्वेष करत नाही. कारण आपण ज्याचा द्वेष करतो त्याच्यासारखे आपण बनतो. उलट द्वेष न केल्याने मित्र, विरोधक, शत्रू यातल्या कुणाहीकडे आपण नितळपणे पाहू शकतो. बंटी आव्हाड हे सामाजिक वंचनेतून निर्माण झालेल्या सार्वत्रिक आक्रोशाचं प्रातिनिधिक चित्र आहे. 'नाही रे' वर्ग पिळून घेऊन आपण त्यावर कायम सरंजामदारी करत राहू, असं ज्या घराणेशाही घराण्यांना वाटतं त्यांचा जितेंद्र आव्हाड सुप्त द्वेष करतो. त्यांना उत्तर द्यायचा आक्रोश करतो. पर्यायाने त्यांच्यासारखाच तो समोर येत राहतो. ज्याच्याबद्दल अनेक जण क्षोभ व्यक्त करतात. राष्ट्रवादीतल्या उत्तम इंग्रजी बोलू शकणाऱ्या मोजक्या पैकी एका सुशिक्षित तरुण नेत्याची हीच खरी शोकांतिका आहे.

जितेंद्र आव्हाडचा (बंटीचा) जन्म नाशिक (सिन्नर)चा. बंटीच्या वडिलांचे वडील म्हणजे आजच्या आमदार जितेंद्र आव्हाडांचे आजोबा हे एक आत्मसन्मान असलेले कष्टकरी म्हणजे, स्पष्ट शब्दात लिहायचं तर हमाल होते. वडील १९७१ साली मुंबईत आले. ताडदेवमध्ये कामगाराची नोकरी करायचे. मध्यंतरी बंटीच्या वडिलांची नोकरी तब्बल दोन वर्षांकरिता सुटली. त्या काळात बंटीच्या आईने गावात नाशिक रोडला शिवणक्लास चालवून खमकेपणाने संसार उभा ठेवला. यातली एक गोष्ट तर फारच सुन्न करणारी आहे. बंटी लहान होता. शिवणक्लासला त्याला नेता यायचा नाही. म्हणून त्याची आई त्याला नाशिक रोडच्या मंडाबाई नावाच्या केळेवालीकडे सोडून जायची. आई कधी येते म्हणून बंटी आई सोडून गेल्यापासून वाट बघत राहायचा. इकडे मुंबईत वडिलांना नोकरी नसल्याच्या काळात पारशी लोकांनी खूपच आधार दिला. बंटीचा त्यामुळे पारशी माणूस हा 'सॉफ्टकॉर्नर' आहे. बंटीच्या वडिलांना (सतीश आव्हाड) त्या काळात अक्षरश: पारशांनी वाचवलं. जगवलं. वडिलांनी भाजी विक्रीचाही व्यवसाय त्याच काळात सुरू केला.

बंटीचं कुटुंबच पुढे ठाण्याला स्थलांतरित झालं. वडिलांनी निम्नमध्यमवर्गीय, मध्यमवर्गीय होण्याइतपत प्रगतीही केली. बंटीच्या दोन बहिणी आहेत. हे लोक ठाण्याला राहायला आले तेव्हा वडिलांनी तळोजाला नोकरी पकडली. बंटीची त्या वेळची आठवण म्हणजे खूप पहाटे उठून ते कामावर जात. मरेमरेस्तोवर कष्ट करत. तेव्हाचं ठाणं गाव खूपच ब्राह्मणी होतं. ब्राह्मणांची घरं ही खेळायला, जेवायला, सणासुदीला या आव्हाड कुटुंबियांशी अघोषित बहिष्कार टाकून असत. बंटीला आजही हा किस्सा खरवडून विचारला तर जवळजवळ रडूच येतं. "सालं, साधं खेळायला घेत नसत रे!" एवढंच बोलून तो गप्प होतो. पुढचं वाक्य विषयापासून खूप दूर नेणारं असतं त्याचं.

बंटीची आई (लीलाबाई) खूप खमकी स्त्री होत्या. निरीश्वरवादी पण तेवढय़ाच सहिष्णू पक्क्या. त्यांच्या या गुणांना त्यांच्या सुनेनं (म्हणजे ऋता वहिनींनी) तोंड दिलंय. (पण ते वेगळं. नंतर येईलच.) बंटीच्या आईंचा फक्त शिक्षणावर आणि कर्तृत्वावर विश्वास होता. नशीब ही गोष्ट तर त्या मानत नसत. बंटीकडनं नशिबाबद्दल त्यांचं (लीलाबाईंचं) एक वाक्य नेहमी मी ऐकलंय् "सालं चुलीकडे हगायचं नि म्हणायचं नशिबात हेच लिहिलं होतं!" बंटी जो काही आज 'माननीय' वगैरे झालाय् तो त्यांच्यामुळेच. धडका देऊन ठोक नशिबाला आणि ठोक मध्ये येणाऱ्याला हे तो आपल्या आईकडून शिकलाय्. तो गंडे, दोरे, ताईत, आंगठय़ा घालत नाही. तो म्हणतो, ताबेदार. बंटीची आई हे बंटीचं सर्वस्व. ती मृत्युशय्येवर होती. सर्व निरीश्वरवादी उपायांनी हात टेकल्यावर बंटीने त्या बाबांचा धावा करायचा ठरवला. बंटीचे दिघेंशी उत्तम संबंध असल्यामुळे त्यांना त्याच्या आईच्या अवस्थेची कल्पना होती. बंटी रोज सकाळ-संध्याकाळ दिघेंना त्या बाबांना सांगा, मी जाऊन आईसाठी घेऊन येतो, असं विनवायचा. दिघे रोज त्याला आज-उद्या असं करायचे. महिना लोटला. बंटीची आई अत्यवस्थ. शेवटी बंटीने दुसराच एक वशिला लावला (मला तो माहीत आहे पण बंटीने मी तो लिहू नये, अशी मैत्रीची शपथ घातलीय्.). त्या अद्भुत शक्ती आहे, असं मानल्या गेलेल्या अवलिया बाबाला बंटीने डुंगरपूरहून डायरेक्ट घरी आणला. आल्यावर बाबाने वजू (हातपाय धुणे) केला. मग बंटीच्या आईची मान उशाखाली हात घालून उचलली. त्या क्षणी ती कलंडली. बंटीच्या आईच्या मृत्यूचा तो क्षण बंटीने स्वत: पाह्यला. तेव्हा त्याला आनंद दिघेंनी फुकट घालवलेला महिना डोक्यातच गेला. मी अनेकदा बंटीला विचारलंय की, तो बाबा लवकर येण्याने लीलाबाई वाचणार होत्या का? पण इथे तो तर्क लावत नाही. इथे तो निरीश्वरवादी होत नाही. फक्त जत्रेत हरवलेल्या मुलासारखा मान हलवतो. होर्डिंग्जवर तुम्हाला मला दिसणारा बंटी तो नसतो.

बंटी लालबहाद्दूर शास्त्री नॉटिकल इंजिनीअरिंग कॉलेजला असताना त्याचं दत्ता सामंतांच्या पुतणीशी आणि दादा सामंतांच्या मुलीशी (ऋता वहिनी) प्रेम जुळलं. दत्ता सामंतांचा तेव्हा जबर दबदबा होता. त्यांनी थेट डॉकच्या चेअरमनला फोन लावून या मुलाची १२ वी सायन्सची सर्टिफिकेटस् बनावट असल्याचं कारण देऊन काढून टाका, असं सांगितलं. बिचाऱ्या चेअरमनने 'सर्टिफिकेटस् अंडर व्हेरिफिकेशन' या कारणासाठी बंटीला बाहेर काढला. बंटी सात महिने कॉलेजबाहेर चकरा मारत असे. शेवटी एका अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरला दया आल्यामुळे त्याने बंटीला त्याच्या गच्छंतीचं खरं कारण सांगितलं. बंटीच्या बहिणीचे पती हे अशोक चव्हाणांचे (आताचे मुख्यमंत्री. तेव्हाचे गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांचे पुत्र) मित्र. त्यांच्यामार्फत शंकररावांकडे बंटीने आपली कैफियत नेली. त्यांनी तत्कालीन संरक्षणमंत्री के. सी. पंतांना फोन केला. के. सी. पंतांनी पेन्सिलीने बंटीबद्दल सकारात्मक रिमार्क लिहिला. तेव्हा कुठे पुढे जाऊन बंटी मरिन इंजिनीअर झाला; परंतु ऋता वहिनींवरच्या प्रेमात बंटीच्या शिक्षणाचे सात महिने वाया गेले (कदाचित आयुष्यही वाया गेलं असतं), हा डंख बंटीच्या आई सुनेबाबत कधीही विसरू शकल्या नाहीत. पुढे बंटी पद्मसिंह पाटील, अरुण मेहता आणि सुरेश कलमाडींमुळे शरद पवारांच्या अधिकाधिक जवळ गेला. पवारांनीच पुढे त्याला यशाच्या शिडय़ांची दारं उघडी करून दिली.

त्याची जनमानसात जी इमेज आहे त्यामुळे तो मरतोय्, असं त्याला सांगितलं तर, "च्यायला, राबोडी दंगलीत मी गोल टोपी घालून बजरंग दलाच्या चाळीस जणांना आणि शिवसेनेच्या एका शाखाप्रमुखाला (एकनाथ शिंदेंच्या सांगण्यावरून) वाचवलं. तर मला टोपीसाठी अल्पसंख्यांकाचं लांगुलचालन करणारा ठरवलं गेलं. चंदू कुलकर्णीने तेव्हा माझी बाजू घेणारा, खरं सांगणारा लेख लिहिला. तरीही इमेज काही बदलली नाही. आता तू उपाय सांग. तो करून बघतो!" असं सांगतो.

एक गंमत सांगतो- ९८२००५५३०० हा बंटीचा (खरा) मोबाईल नंबर आहे. त्याच्याने होणारं कुठचंही काम कितीही सामान्य माणसाने त्याला रात्री दोन वाजता उठवून सांगितलं तर ते तो करण्याचा प्रामाणिक प्रयत्न नक्की करतो. मुख्य म्हणजे त्याचा फोन तो दुसऱ्या-तिसऱ्या रिंगमध्ये 'स्वत:' उचलतो. 'साहेब बाथरुमात आहेत', 'साहेब झोपलेत', 'साहेब मिटिंगमध्ये आहेत,' असं दुसरंच कुणी सांगत नाही. तो मिटिंगमध्ये असेल तर स्वत:च सांगून पुन्हा फोन करतो. विलासराव देशमुख, छगन भुजबळ, सुनील तटकरे, सुशिलकुमार शिंदे, शरद पवार वगैरे (यादी अपूर्ण) राजकारणी माणसांकडून हा चांगला गुण त्याने घेतलाय.

'साहेब बाथरुमात आहेत', 'साहेब झोपलेत', 'साहेब मिटिंगमध्ये आहेत,' असं दुसरंच कुणी सांगत नाही. तो मिटिंगमध्ये असेल तर स्वत:च सांगून पुन्हा फोन करतो. विलासराव देशमुख, छगन भुजबळ, सुनील तटकरे, सुशिलकुमार शिंदे, शरद पवार वगैरे (यादी अपूर्ण) राजकारणी माणसांकडून हा चांगला गुण त्याने घेतलाय.

पण तरीही मला काही कारणासाठी बंटी आव्हाड राग आणतो. तो फार फार उद्धट आहे हे खरं आहे पण मला ते काही नवीन नाही. ते माझं कारण नाही. माझे बहुतेक मित्र फार उद्धटच आहेत. शिवाय बंटीचे दोन विरोधक त्याच्या घरातच आहेत. दहावीत शिकणारी त्याची मुलगी नताशा आणि पत्नी ऋता. या दोघी त्याचा वाढदिवस संपला की पी.एं.ना सांगून घाईने होर्डिंग्ज उतरवून घेण्यामागे असतात. मला या होर्डिंग्जचंही काही वाटत नाही. आपण दिघे, गांधी, पवार, ठाकरे यांच्या होर्डिंग्जवर कुठे नाकं मुरडतो? मुद्दा हा आहे की, जी व्यवस्था बंटीसारख्यांना लहानपणापासून नाकारते. म्हणजे बंटीच एकदा मला म्हणाला होता की, प्रस्थापित घराण्याचं आडनाव आधीच २५ मार्कस् देतं. मग त्यांना उरलेल्या फक्त ७५ मार्कासाठी मेरीटवर धावावं लागतं. तुझ्या-माझ्यासारख्यांना वजा २५ मार्क असतात. अॅव्हरेजवर यायलाच अर्ध आयुष्य जातं. पुन्हा हे लोकं भिंग लावून आपलंच काय नैतिक-अनैतिक ते बघणार.. थकवणारं आहे रे हे सगळं.." हे कळूनही बंटी नेमक्या त्याच मार्गाने जातोय. अधिक उत्साहाने. 'जी हुजूरी' करत जातोय. यानेच माझं डोकं अधिक फिरतं. या देशात गांधी, ठाकरे, सिंदिया वगैरे वगैरेंचं नाव (यादी अपूर्ण) चालण्याचं हे तंत्र कण्यातून मोडायला नको? केवळ घराण्याचं नाव चालू नये. केवळ नाव नाही म्हणून अवहेलना नको. समता काय फक्त राज्यघटनेतच राहिली? बंटी तू असाच वागत राहिला तर एक दिवस मला म्हणायची वेळ येईल, "स्वत:च चुलीजवळ हगायचं आणि म्हणायचं नशिबातच हे होतं!"

raju.parulekar@gmail.com